पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक: नस/४/कावि/ ८४६ /२०१३
दिनांक : १०/०९/२०१३

प्रति,

मा. ...................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/०९/२०१३ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे सप्टेंबर २०१३ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०/०९/२०१३ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## सूचना

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये)

## कार्यपत्रिका क्रमांक २१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे सप्टेंबर २०१३ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०/०९/२०१३ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

---------------

मा.महापालिका सभा क्र.१९ दि.२०/०७/२०१३ व २६/०७/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

## प्रश्नोत्तरे

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

---------------

## मा.स्थायी समितीचे ठराव

**विषय क्रमांक १)** संदर्भ:-१) मा मा.महापालिका आयुक्त याचे जा.क्र.वैद्य/७/कावि/१५३६/२०१३, दि.५/८/२०१३.
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.३८९७ दि.१३/८/२०१३

महाराष्ट्र शासनाकडून राष्ट्रीय रक्तपेढी धोरण राबविणेकामी यापुर्वी मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २२२७ दि. २६/१२/२०१२ चे शिफारस व महापालिका ठराव क्रमांक १७७ दि. ११/०२/२०१३ अन्वये चे मान्यता नुसार प्रपत्र अ मधील दर कायम ठेवुन प्रपत्र अ मधील मनपा रुग्णालयासाठी जे नवीन दर आहेत ते मनपा व शासकीय रुग्णालय यांचेसाठी लागु करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**प्रपत्र अ**

| अ.क्र | रक्त/रक्तघटक नाव | शासनाचे शुल्क (चाचण्या व बॅग्जसह) | क्रांतिवीर चापेकर बंधु रक्तपेढीचे शुल्क | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मनपा व शासकीय रुग्णालयासाठी | | | खाजगी रुग्णालयासरठी | | |
| | | | तपासणी शुल्क | इशु शुल्क | एकुण | तपासणी शुल्क | इशु शुल्क | एकुण |
| 1 | PCV & WB | 850 | 90 | 335 | 425 | 110 | 740 | 850 |
| 2 | FFP | 400 | 90 | 310 | 400 | 110 | 290 | 400 |
| 3 | Platelets | 400 | 90 | 310 | 400 | 110 | 290 | 400 |
| 4 | Cryopre cipitate | 200 | 90 | 110 | 200 | 110 | 90 | 200 |

**विषय क्रमांक २)** संदर्भ - १) मा.आयुक्त यांचे जा.क्र.स्थासंक/२३/कावि/१५/२०१३, दि.३०/०८/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा दि.१०/०९/२०१३, ठ.क्र.४०६९

स्थानिक संस्था कर विभागाकडे जमा होणा-या रकमांचे लेखाशिर्षनिहाय वर्गीकरण होणेसाठी खालील प्रमाणे दोन लेखाशिर्ष व त्यासमोरील तरतुद सन २०१३-२०१४ चे अंदाजपत्रकात नव्याने निर्माण करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

| | |
|---|---|
| स्थानिक संस्था कर व्याज (LBT Int.) | ५०,०००/- |
| स्थानिक संस्था कर दंड (LBT Penalty) | ५०,०००/- |
| **एकुण** | **१,००,०००/-** |

**विषय क्रमांक ३)** संदर्भ - १) मा.आयुक्त यांचे जा.क्र.अग्नि/१/कावि/३००/२०१३, दि.२९/०८/१३
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.४०७१ दि.१०/०९/२०१३,

मनपाचे अग्निशामक विभागांतर्गत आपत्ती व्यवस्थापन विभागास शासनाकडून प्राप्त झालेली र.रु.५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) शासकीय सहाय्यक अनुदानाचा विनियोग योग्य रितीने होणेकामी " बिगर प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन अनुदान " या नावे तुर्त अग्निशामक विभागामध्ये नविन लेखाशिर्ष व त्यांचे स्वतंत्र खाते निर्माण करणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ४)** संदर्भ - १) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.वैद्य/७/कावि/१७६१/२०१३, दि.०२/०९/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.४०७७ दि.१०/०९/२०१३,

अंध असलेले अपंगाना त्यांनी अपंगत्वाचे प्रमाणपत्राची/दाखला मागणी केल्यास त्यांचेकडुन अपंग असलेबाबतचे कागदपत्रांची पडताळणी करुन व शारिरीक तपासणी करुन व नियमानुसार मनपाची फी

आकारुन त्यांना प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करणे व वैद्यकीय तपासणी करताना सर्व तपासण्या उदा. रक्त, लघवी, थुंकी तपासणी फी, एक्सरे फी, सोनोग्राफी फी, अशा प्रकारच्या सर्व तपासण्या मोफत करणेस मान्यता देणे परंतु तपासणी फी (केस पेपर व केसपेपर सोबतची सल्ला फी) व दाखला माफ असणार नाही. सदरचा विषय मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

## मा.विधी समितीचे ठराव

**विषय क्रमांक ५)** संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४०/२०१३, दि.१६/०६/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र. ३१ दि. ०२/०८/२०१३

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३४५ दि.१९/०८/२०१३

डॉ.उदय टेकाळे, सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २७/०८/२०१३ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**(टिप - माहे सप्टेंबर-२०१३ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

**विषय क्रमांक ६)** संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/८१२/२०१३, दि.२१/०६/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.३७ दि.०६/०९/२०१३

डॉ.के.अनिल रॉय, वैद्यकीय अधिकारी यांना र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० या वेतनश्रेणीमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ७)** संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/ ५५६/२०१३, दि.०२/०८/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.४१ दि.०६/०९/२०१३

औंध-रावेत बी.आर.टी.एस. रस्त्यावरील वाय जंक्शन येथे अंडरपास बांधणेचे कामास व याकामी येणा-या र.रु.१३,४२,२१,६९०/- च्या अंदाजपत्रकीय खर्चास मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ८)** संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. आ.मु.का./३/कावि/५११/ २०१३, दि.२०/०७/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.४२ दि.०६/०९/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील हॉटेल/कॅन्टींन व अन्य खाद्यपदार्थ उत्पादन/विक्री करणा-या व्यवसायांना त्यांचे व्यवसायातून दैनंदिन निर्माण होणारे फुडवेस्ट गोळा करणे व वाहतूक करुन कचरा डेपो येथे विल्हेवाट लावणे कामासाठी सध्या आकारणेत येणा-या शुल्कामध्ये परिशिष्ट

“अ” मध्ये नमुद केलेप्रमाणे हॉटेल/कॅन्टीन वेस्ट गोळा करणे सेवेसाठी आकारणेत येणा-या शुल्कामध्ये वाढ करणे तसेच मंगल कार्यालये, मॉल, स्वीट मार्ट, हॉल, सभागृह, बेकरी व्यवसायांना प्रपत्र “ब” प्रमाणे वाढ करणेस तसेच परिशिष्ट “ब” मधील अ.क्र.२ मध्ये मॉलमधील हॉटेलसाठी स्वतंत्रपणे सेवाशुल्क आकारणेस, तसेच परिशिष्ट “ब” मध्ये मॉलची संख्या २ नमुद केली आहे, त्याऐवजी “मनपा कार्यक्षेत्रातील सद्यस्थितीत मॉलची यादी” प्रमाणे एकूण १० मॉल चालू आहेत. तरी विषयपत्रात १० मॉल गृहित धरुन त्यास, त्याचप्रमाणे मनपा क्षेत्रात यापुढे नव्याने चालू होणारे व्यवसायासाठी सदरचे दर लागू करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**परिशिष्ट “ अ ”**

| अ.क्र. | हॉटेलचा दर्जा | हॉटेलची संख्या | सध्याचे सेवाशुल्क (वार्षिक) र.रु. | वाढ केल्यानुसार नविन सेवाशुल्क (वार्षिक दर) र.रु. | मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | “ अ ” | २०६ | ३,०००/- | ८,०००/- | १६,४८,०००/- |
| २ | “ ब ” | १३१ | २,०००/- | ६,०००/- | ७,८६,०००/- |
| ३ | “ क ” | ३८१ | १,०००/- | ४,०००/- | १५,२४,०००/- |
| ४ | “ ड” | ५३९ | ---- | ३,०००/- | १६,१७,०००/- |
| | **एकूण** | **१२५७** | **----** | **----** | **५५,७५,०००/-** |

**परिशिष्ट “ ब ”**

| अ.क्र. | दर्जा | संख्या | आकारावयाचे वार्षिक सेवाशुल्क र.रु. | मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मंगल कार्यालये | ४९ | १०,०००/- | ४,९०,०००/- |
| २ | शॉपिंग मॉल, मेगा मार्ट | ०२ | १५,०००/- | ३०,०००/- |
| ३ | फाईव्हस्टार, थ्रीस्टार रिसोर्टस् | ०७ | १२,०००/- | ८४,०००/- |
| ४ | हॉल | ०१ | ५,०००/- | ५,०००/- |
| ५ | सभागृह | ०१ | ५,०००/- | ५,०००/- |
| | **एकूण** | **६०** | **-----** | **६,१४,०००/-** |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सद्यस्थितीतील मॉलची यादी

| अ.क्र. | प्रभाग कार्यालय | मॉलचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | "अ" प्रभाग | स्टार बझार | काळभोरनगर, मुंबई-पुणे रोड |
| | | डी मार्ट | प्राधिकरण, डी.वाय.पाटील, रावेत रोड |
| २ | "ब" प्रभाग | बिग बझार | चिंचवड, मुंबई-पुणे रोड, बीग सिनेमाखाली |
| | | डी मार्ट | चिंचवड, मुंबई-पुणे रोड |
| | | मोअर फॉर यु | मोरवाडी |
| ३ | "क" प्रभाग | मेगा मार्ट | फुगेवाडी, मुंबई-पुणे रोड |
| ४ | "ड" प्रभाग | डी मार्ट | थेरगाव (काळेवाडी) |
| | | मोअर फॉर यु | पिंपरीगांव |
| | | मोअर फॉर यु | विशालनगर, जगताप डेअरी |
| | | मोअर फॉर यु | शिवार चौक, पिंपळे सौदागर |

**विषय क्रमांक ९)** संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/ड/७४०/२०१३,
दि.१६/०८/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.४७ दि.०६/०९/२०१३

पिंपळे सौदागर ते पिंपळे गुरव मिलिटरी हद्द येथील गुरुत्व नलिका शिफ्ट करणे या कामाचे आवश्यकतेनुसार होणा-या अंदाजपत्रकीय र.रु.१,४१,००,०००/- प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १०)** संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नस/२/कावि/४०३/२०१३,
दि.२८/८/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.६६ दि.०६/०९/२०१३

चीन या देशातील शांग्यांग शहर व पिंपरी चिंचवड शहर यांचेमध्ये उद्योग, व्यापार, तंत्रज्ञान, संस्कृती, आरोग्य याबाबत विचारांचे आदान-प्रदान करुन दोन्ही शहरांचा विकास करण्याच्या उद्येशाने सिस्टर सिटी (Sister City) चा प्रस्ताव महापालिकेस देण्यात आला असून सदर सिस्टर सिटीबाबत सहकार्य करार करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ११)** संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र/का.अ/बी.आर.टी.एस/६२४/२०१३,
दि.५/९/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.७० दि.०६/०९/२०१३

देहु आळंदी रस्त्याचे साखळी क्रं. ८/२५० ते १५/२५० किमी मधील रस्ता रुंदीकरण व मजबुतीकरण करणे अंतर्गत फुटपाथ बांधणे, पावसाळी पाण्याच्या पाईप लाईन टाकणे, पाणीपुरवठा व

जलनि:सारणासाठी मोठया व्यासाच्या लाईन टाकणे, रस्ता दुभाजक बांधणे इ.कामे करणे आवश्यक आहे. सदर कामे IRC च्या मानांकाप्रमाणे करणेत येणार आहे. सदर उर्वरीत कामे करणेसाठी मनपाच्या चालु प्रचलित दरसुची २०१२ – १३ नुसार अंदाजपत्रक हे सदर कामाचे तांत्रीक सल्लागार मे.पेव्हटेक कन्सलटंट यांनी तयार केले असुन त्यांची अंदाजपत्रकीय र.रु. ४४,३०,१५,५६२/- इतकी आहे. सदर काम करणेसाठी मनपाच्या सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विशेष योजना या लेखाशीर्षावर अ.नं.१०३ पानांक २९ वर र.रु. १०,००,००,०००/- तरतुद केली असुन त्यामधुन सदर काम करुन घेता येईल. सदर काम करणेकामी येणा-या र.रु. ४४,३०,१५,५६२/- च्या खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १२)** संदर्भ : १) मा.वैशाली काळभोर,मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव..
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.७२ दि.०६/०९/२०१३

मा.महापालिका सन २०१३ - १४ चे अंदाजपत्रकामध्ये क प्रभागाचे पांजरपोळ येथे २.०० द.ल.लि. क्षमतेची आर.सी.सी. उंच टाकीचे संकल्पन करणे, बांधणे, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे या कामाचा समावेश पान क्र. ६९९/५६ येथे आहे. सदर कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ७०,००,०००/- इतकी आहे. या कामासाठी र.रु. १,५०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १३)** संदर्भ : १) मा.प्रशांत शितोळे, मा. शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.७३ दि.०६/०९/२०१३

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने सांगवी येथे ऐतिहासीक उद्यान निर्माण झाले आहे. सांगवी येथील स.नं.६ मधील स्वर्गीय तानाजीराव शितोळे (सरकार ) उद्यान (शिवसृष्टी) मध्ये उर्वरित काम करणेसाठी अंदाजपत्रक २०१३ – १४ मध्ये अंदाजपत्रकीय रक्कम रु. ९० लाख इतकी असुन या कामासाठी तरतुद रक्कम रुपये ७५ लाख इतकी असल्याने व प्रत्यक्ष उद्यानाची जागा १००% ताब्यात असल्याने तरतुदींचे रकमेच्या दुप्पट रकमेचे काम करणेस मान्यता व्हावी व अंदाजपत्रकीय रक्कम रु. २ कोटी पर्यंतचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

## <u>मा.शहर सुधारणा समितीचे ठराव</u>

**विषय क्रमांक १४)** संदर्भ:१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था.EWS/२०२/२०१३,
दि.०३/०६/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.०९/०७/२०१३ ठ.क्र.१९ नुसार
३) मा.महापालिका सभा ठ.क्र. ३४७ दि. १९/०८/२०१३

पिंपरी चिंचवड मनपाच्या JnNURM - BSUP अंतर्गत आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी राबविण्यात येणा-या EWS घरकुल योजनेअंतर्गत च-होली व डुडुळगाव येथे ११३४ घरे बांधणे प्रस्तावित असुन त्यादृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे DPR मधील १३२५० घरापैकी चिखली येथील से.क्र.१७ व १९ मधील ६७२० घरे व च-होली व डुडुळगाव येथील ११३४ घरे असे एकुण ७८५४ घरांचे काम

पुर्ण होईल. उर्वरीत ५३९६ घरे जागेअभावी व JnNURM Mission चा कालावधी मार्च २०१४ अखेर असल्यामुळे बांधणे शक्य नाही. या अनुषंगाने प्रकल्प ७८५४ सदनिकांपर्यंतच सिमित करणेबाबतचा सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल (D.P.R.) शासनाकडे पाठविणे आवश्यक असल्याने सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**(टिप - माहे सप्टेंबर-२०१३ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

**विषय क्रमांक १५)** संदर्भ:१) मा.प्रभाग अधिकारी यांचेकडील जा.क्र.कप्रस/सभा/११/कावि/१५७/२०११ दि.२४/१०/२०११

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.०८/०८/२०१३ ठ.क्र.२४ नुसार

मा. क प्रभाग समिती सभा दि.०७/०९/२०११ ठराव क्र.४२ नुसार प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील हरित विभागातील क्षेत्र लगतच्या निवासी विभागासह यापूर्वी मनपाचे नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट झाले आहे. तथापि गाव मौजे-बो-हाडेवाडी येथील नविन गट नंबर ७५ व लगतचे क्षेत्र प्राधिकरणाने संपादन केलेले नाही. मात्र सदर क्षेत्र नजरचुकीने प्राधिकरणाचे नियंत्रणाखाली ठेवले गेले आहे. या ठिकाणी विकास परवानगी घेणेसाठी जमीनधारक प्राधिकरणाकडे गेल्यास क्षेत्र मनपाचे नियोजन नियंत्रणाखाली असल्याचे प्राधिकरणाकडून सांगण्यात येते व यापूर्वी मनपाकडे आलेले क्षेत्रात या जागेचा समावेश नसल्याने मनपा मार्फत विकास परवानगी देण्यात येत नाही. सबब असे सर्व क्षेत्राचा शोध घेऊन ते मनपाचे नियोजन नियंत्रणात घेऊन म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन सदर क्षेत्राच्या झोन निश्चितीची कार्यवाही करावी. उक्त अधिनियमाचे कलम ३७ अन्वये करावयाचे कार्यवाहीस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस असली तरी सदरचा प्रस्ताव नगररचना विभागामार्फत तपासणी व आवश्यक दुरुस्त्यांसह फेरप्रस्ताव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १६)** संदर्भ:१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/BSUP/३०७/२०१३, दिनांक ०७/०८/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.०८/०८/२०१३ ठ.क्र.२६ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत BSUP-JnNURM अंतर्गत मिलिंदनगर, से.२२ निगडी, वेताळनगर, अजंठानगर, विठ्ठलनगर या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांचा SRA मार्फत बांधकाम परवानगी प्राप्त आहे. संक्रमण शिबीरामध्ये स्वच्छतागृहे, गटर पाण्याची व्यवस्था, विद्युत काम इ. सुविधा मनपामार्फत मनपाचे खर्चाने पुरविलेल्या आहेत. प्रत्येक पत्राशेडमधील लाभार्थी त्यांची वैयक्तिक वीज जोडाचे (Electric Connection Meter) देयक तो स्वत:च भरत असतो. आतापर्यंत से.२२ वेताळनगर व मिलिंदनगर प्रकल्पात हीच practice गेले ५ वर्ष चालू आहे. तथापि दि.२५/०७/२०१३ च्या पत्रान्वये मिलिंदनगर येथील झोपडपट्टीधारकांनी निर्मुलन आदेशामधील अटींचा उल्लेख करुन त्या अनुषंगाने लाभार्थ्यांच्या वैयक्तिक वीज जोडाचे बील मनपाने भरावे अशी मागणी केलेली आहे.

सदर प्रकल्पाच्या निर्मुलन आदेशा सोबतच्या अटींमध्ये अट क्र.२ अन्वये लाभार्थ्यांच्या तात्पुरत्या राहण्याच्या व्यवस्थेसाठी बांधण्यात येणा-या संक्रमण शिबीरात लाईट, पाणी, सांडपाण्याची सोय, स्वच्छतागृहे आदी आवश्यक बाबींची सुविधा विकास कामे करुन द्यावयाची आहे. संक्रमण शिबीरातील सुविधा प्रित्यर्थ येणारे सर्व शुल्क विकासकाने भरणे बंधनकारक आहे. संक्रमण शिबीरात मनपा मार्फत उपरोक्त सुविधा मनपाचे खर्चाने पुरविलेल्या आहेत. विषयांकित निर्मुलन आदेशामध्ये मासिक विद्युत बील विकसकाने भरावयाचे आहे असे कोठेही नमुद नाही. तसेच सदरचा प्रकल्प BSUP-JnNURM अंतर्गत राबविण्यात येत आहे. DPR मध्ये मासिक विद्युत बिलाचा खर्च अंतर्भूत नाही त्यामुळे Transit Camp मधील वैयक्तिक विद्युत देयके लाभार्थ्यांनी अदा करावयाचे आहे अशी प्रशासनाची धारणा आहे. तरी BSUP-JnNURM अंतर्गत सर्व झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील पत्राशेडमधील वैयक्तिक विद्युत देयक लाभार्थ्यांने भरावे किंवा मनपाने भरावे याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

## समित्यांचे अहवाल

### मा.विधी समिती

**विषय क्रमांक १७)** दिनांक ०२/०८/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

### मा.महिला व बालकल्याण समिती

**विषय क्रमांक १८)** दिनांक २४/०७/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

### मा.शहर सुधारणा समिती

**विषय क्रमांक १९) अ)** दिनांक १७/०७/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

**ब)** दिनांक ०७/०८/२०१३ व ०८/०८/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

### मा.क्रिडा समिती

**विषय क्रमांक २०) अ)** दिनांक १७/०७/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

**ब)** दिनांक ०७/०८/२०१३ व १२/०८/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ८४६ /२०१३
दिनांक :१०/०९/२०१३

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

**माहे सप्टेंबर २०१३ चे मा. महापालिका सभेमध्ये मा. भाऊसाहेब भोईर यांना विचारावयाचे प्रश्न -**

---

प्रश्न क्र.१) बंद नळ योजनेची निविदेची जाहिर नोटीस कोणत्या साली निघाली ?

अ) अंतिम कामाचे आदेश कधी दिले गेले ?

ब) मूळ निविदा किती रकमेची होती ? किती टक्के वाढीव दराने निविदा होती ?

क) जे.एन.एन.यु.आर.एम. माध्यमातून कोणत्या रकमेवर सवलत होती मूळ रकमेवर की वाढीव दरावर ?

प्रश्न क्र.२) निविदा मंजूर झाल्यानंतर विकसकास किती रक्कम अदा करण्यात आली ?

अ) कामाची मुदत किती होती ?

ब) जर मुदत संपली असेल तर विकसकाने नुकसान भरपाई मागितली का ? असेलतर किती रक्कम मागितली ?

क) आजपर्यंतचा कालावधी किती व सद्यस्थिती काय आहे ?

---